नांदेड
• बुधवार, दि. १२ एप्रिल २०२३
• किंमत २+१=३ रुपये
• वर्ष- ८ वे । अंक ७ । पाने ८
RNI : MAHMAR/2015/64592

• जनसामान्यांचे हक्काचे दैनिक

# लोकमंथन

www.lokmanthan.com

संपादक : डॉ. अशोक सोनवणे

# उस्माननगर येथे सायबर गुन्हे विषयी नाटीकेतून जनजागृती

उस्माननगर । प्रतिनिधी

नांदेड पोलीस व क्लिक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने उस्माननगर पोलिस स्टेशन हद्दीतील प्रमुख गावा गावातील मुख्य ठिकाणी सायबर सुरक्षा रथाचे स्वागत करून कलाकारांनी सायबर गुन्हेगारी विषयी नाटीका सादरीकरण करून जनजागृती केली. यावेळी नागरिकांनी ऐकण्यासाठी व पाहण्यासाठी गर्दी केली होती.

अलीकडच्या काळात ऑनलाइन व्यवहाराचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे सायबर गुन्हे घडून जनतेची आर्थिक फसवणूक होण्याचे प्रमाण देखील दिवसेंदिवस वाढत आहेत सदरच्या घटना टाळण्यासाठी नागरिकांनी ऑनलाईन आर्थिक व्यवहार तसेच सोशल मीडियाचा वापर करताना कोणत्या गोष्टी कराव्यात व कोणत्या गोष्टी करू नयेत याबाबत जनतेमध्ये सायबर गुन्ह्याबाबत जनजागृती करण्यासाठी माननीय श्री डॉक्टर शशिकांत महावरकर पोलीस उप महानिरीक्षक नांदेड ,परिक्षेत्र नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीकृष्ण कोकाटे पोलीस अधीक्षक नांदेड यांच्या संकल्पनेतून क्लिक हिल फाउंडेशन व नांदेड पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा रथ तयार करण्यात आला .पोलीस उपनिरीक्षक शशिकांत महावरकर यांच्या हस्ते रथाचे उद्घाटन करण्यात आले. हा रथ नांदेड जिल्ह्यातील ३६ पोलीस स्टेशन अंतर्गत शाळा कॉलेज महाविद्यालय व गर्दीच्या ठिकाणी असे एकूण १२८ ठिकाणी जाऊन जनतेमध्ये सायबर गुन्हे विषयी जनजागृती करणार आहेत यांचाच एक भाग म्हणून उस्माननगर तालुका कंधार येथील बसस्थानक येथे दिनांक ११ एप्रिल २०२३रोज मंगळवार रोजी ठिकठिकाणी नांदेड पोलीस व क्लिक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर गुन्हे विषयी जनजागृती करण्यात आले यामध्ये जनजागृती द्वारा मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे परिणाम, सोशल मीडिया व ऑनलाइन पेमेंट च वापरताना कोण कोणती खबरदारी घ्यावी व आपली ऑनलाइन फसवणूक होणार नाही याबाबत कशाप्रकारे काळजी घ्यावी तसेच



ऑनलाईन सायबर क्राईम कसा प्रकारे होतात असे की सोशल मीडियाचे प्रोफाइल लॉक न केल्याने आपल्या मोबाईलवर आलेला ओटीपी दिल्याने कोणत्याही अनोळखी लिंक ला क्लिक करून त्यावर आपले बँक खात्यांची माहिती दिल्याने कशाप्रकारे फसवणूक होते याबाबत पथनाट्य सादर करून सायबर जनजागृती करण्यात आली. सायबर जनजागृती पथनाट्यामध्ये सायबर पोलीस स्टेशन नांदेडचे काशिनाथ कारखेडे ,क्लिकहिल फाउंडेशन तर्फे आधार सामाजिक संस्था सातारा या पथनाट्य पथकातील कलाकार सुनिल ननावडे,मल्हारी जाधव,राजेंद्र मोरे ,कार्तिक रांजे,सुरज बाबर,किरण घोरे,गणेश महाजन,आनंद भगत इत्यादी कलाकारांनी सायबर गुन्हाविषयी पथनाट्यातून जनतेला माहिती दिली यावेळी उस्माननगर पोलीस स्टेशनचे स.पो.नि.पी.डी.भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गजानन गाडेकर,पोलीस कर्मचारी अनिरुद्ध वाढे, यांची प्रमुख उपस्थितीती होती. यावेळी पोलीसपाटील विठ्ठल मोरे,गुत्तेदार दत्ताने प्रमुख सलीम शेख,कांता सोनसळे,पत्रकार माणिक भिसे,व गावातील नागरीक व बालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.